


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १५१ ● सोमवार, दि. ०९ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# विस्थापिताचा 'नाथ', नव्या लोकनेत्याचे लोकार्पण

# बजरंग बाप्पा तुम्ही खासदार काय असतो ! दाखवले





**बीड । प्रतिनिधी**

एक खासदार लोकात येत असतो, तो लोकांना वेळ देखील देत असतो, ते आणि त्यांचा ताफा गल्ली बोळात जात असतो, खासदार फोन उचलत असतात जनता दरबार भरवत असतात, लोकसाठी अधिकाऱ्यांना धारेवर धरत असतात हे लोकाना केवळ पुस्तकात वाचायला मिळायचे, मात्र बजरंग सोनवणे यांनी ते दाखवून दिले की खासदार किती कामदार असतो.

या जिल्ह्याला पहिल्यांदा विस्थापितांचा चेहरा खासदार म्हणून लाभला आहे . गुलाल घेतलेले हे खांदे आज जनतेला आधार देताना थेट चिखल तुडवत आहेत . बजरंग सोनवणे यांना आपण खासदार असल्याची जबाबदारी आहे , सहज उपलब्धता आणि सर्वांवर सारखे प्रेम देण्याची त्यांची पद्धत त्यांना लोकनेता ठरवते . गावांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून त्यांना धीर दिला व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तात्काळ उपाययोजना राबविण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

➧ (उर्वरित पान २ वर)

### ▸ आमच्या वेदना संसदेत नेल्यात : धनंजय गुंदेकर

**आम्ही विम्या साठी गेली अनेक वर्षे कंपनी सरकार सोबत लढत आहोत . गेल्या १० वर्षात पहिल्यांदा खासदार संसदेत बोलले हे आमच्यासाठी आश्वासक आहे . बजरंग बाप्पा यांना मागणी केल्यास त्याची ते दखल घेतात हे आम्ही अनुभवत आहोत . असे मार्केट कमिटी बीड संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे.**

### ▸ सामाजिक अभिसरण

**हिंदू मुस्लिमांचे गणित जुळवून सलोख्याची नीती अवलंब बजरंग सोनवणे यांच्या राजकारणात आहे . यातून त्यांना मिळत असलेला प्रतिसाद उद्याच्या राजकारणात प्रभाव टाकेल आणि अनेक नवख्या चेहऱ्यांना हत्तीचे बळ देणार हे नक्की.**

## लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी दत्तात्रय नरनाळे



**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्याचा बुलंद आवाज म्हणून ओळख असणाऱ्या दैनिक मराठवाडा पत्र चे मुख्य संपादक दत्तात्रय नरनाळे यांची निवड लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड केली आहे. लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य यांच्या हस्ते त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्यभरात लोकशाही पत्रकार संघामुळे पत्रकारांचे मजबूत संघटन उभारले जात आहे. पत्रकारांना विमा कवच, त्यांच्या पाल्यांचे शिक्षण, घर, नवे तंत्रज्ञान कौशल्य, सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजन या प्रश्नांकडे लोकशाही पत्रकार संघाने लक्ष केंद्रित केले असल्याने राज्यभरातील पत्रकारांचा देखील मोठा प्रतिसाद लोकशाही पत्रकार संघाला मिळत आहे.

पत्रकार हा लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ असूनही तो अनेक मुलभूत सुविधांपासून वंचित आहे, त्याच्या संरक्षणाचा प्रश्न मागे पडला आहे, तो लोकशाहीचा महत्वाचा घटक असूनही निराधार असल्याचे दिसते आहे. लोकशाही चे जतन करणे आता लोकशाही पत्रकार संघाचे काम आहे. असे मत व्यक्त केले. यासोबतच डिजिटल मीडिया'ला पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात घेतले जात नाही. 'डिजिटल मीडिया'चे काम करणाऱ्या पत्रकारांन त्यांचे अधिकार मिळत नाहीत. ऑनलाईन क्षेत्रात काम करत असलेल्या पत्रकारांच्या पाठीशी ➧ (उर्वरित पान २ वर)

# मी कोणाच्या नादी लागत नाही; माझ्याही कोणी नादी लागू नये : मनोज जरांगे पाटील

- परळीच्या घोंगडी बैठकीतून देवेंद्र फडणवीस यांना पाटलांचा थेट इशारा
- रात्री अपरात्री अनेकजण भेटायला येऊन पाय धरतात; त्यात भाजपची संख्या जास्त
- मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मागे हटणार नाही; प्रसंगी सरकार पडायला मागेपुढे पाहणार नाही



**परळी । प्रतिनिधी**

आरक्षणाची लढाई आपल्याला जिंकायची आहे. त्याशिवाय मराठा समाजाला गत्यंतर नाही. राजकारण येत राहील, होत राहील. मात्र अरक्षणापासून मराठा समाजाचे एकही घर वंचित राहणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. आरक्षणाच्या लढाईत आपण आता अंतिम टप्प्यात आहोत. शासनालाही आता आरक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. सरकारने जर आरक्षण नाही दिले तर त्यांना परत आपल्याला सत्तेवर येऊ द्यायचे नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात ट्रॅप रचला आहे, दररोज एक आमदार माझ्यावर गरळ ओकत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या नादाला लागू नये अन्यथा महाराष्ट्रात भाजपला बियाला माणूस उरणार नाही असा इशारा मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते परळी वैजनाथ येथे आयोजित घोंगडी बैठकीत बोलत होते.

परळी येथील हलगे गार्डन येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जे जे लोक आणि नेते मराठा आरक्षणाच्या विरोधात गेले आहेत त्यांना येत्या विधानसभा निवडणुकीत हिसका दाखवणार आणि घरी बसवणार. मराठा ➧ (उर्वरित पान २ वर)

### ▸ रात्रीचे भेटण्यास येणाऱ्यांची तर आणखी नावेच सांगितली नाही मी

**मागील अनेक दिवसांपासून माझ्या भेटीला अनेक नेते येत आहेत. रात्रीच्या भेटी घेणारे तर संख्या खूप मोठी आहे. त्यातही भाजपचे लोक जास्त आहेत. राजकीय अस्तित्व धोक्यात आल्याने ते मला भेटायला येतात, म्हणून मला रात्रभर जागावे लागते. मला कुठल्याही राजकीय भूमिकेत अजिबात जायचे नाही. मी कोणत्याही नेत्यांच्या स्वतःहून वाट्याला गेलो नाही. मात्र जर माझ्या आणि समाजाच्या वाट्याला गेले तर मात्र त्यांची हायगय केली जाणार नाही. मी असल्यांना अजिबात सुट्टी देणार नाही हे परळीच्या पवित्र भूमीतून सांगतो असाही इशारा त्यांनी दिला.**



*दैनिक मराठवाडा पत्रकार्यालय मध्ये श्रींची आरती करताना भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथांना शिरोळे माजी नगरसेवक दत्ताभाऊ थिगळे, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, आराध्या नरनाळे आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

## बदामराव पंडीत यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे : जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

सर्कल शिवसेनेची आढाव बैठक आशापुरक गणपती मंदिर या ठिकाणी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख तथा माजी मंत्री बदामराव आबा पंडीत व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली



पिंपळनेर येथील आशापुरक गणपती मंदिर येथे बीड जिल्हा सह संपर्कप्रमुख तथा माजी राज्यमंत्री बदामरावजी आबा पंडित,युवा दलनेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती युद्धजीत दादा पंडित,शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, युवा नेते रोहीत भैय्या पंडीत,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पिंपळनेर जिल्हा परिषद गटातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी लोणी व पाटेगाव येथील युवा तरूणांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला असता त्यांचे शिवसेना परिवारामध्ये

# परळीकरांची सेवा हा माझा धर्म आणि कर्तव्य, अखेरच्या श्वासापर्यंत निभावत राहीन: धनंजय मुंडे



- परळी शहरातील पूरग्रस्त कुटुंबांना नाथ प्रतिष्ठान कडून १० हजार तर प्रशासनाकडून ५ हजारांच्या मदतीचे मुंडेंच्या हस्ते वितरण
- आतापर्यंत ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना मदत मंजूर, ३५ कुटुंबांना प्रातिनिधिक स्वरूपात चेकचे वितरण, उर्वरित कुटुंबांना दोन दिवसात घरपोच वितरण

**परळी वै. । प्रतिनिधी**

आज राजकारणात व समाजकारणात जो काही आहे तो केवळ आणि केवळ परळीतील जनतेच्या आशीर्वादामुळे आहे. त्यामुळे सत्ता असो नसो, परळीकरांची सेवा करणे हा माझा धर्म आणि माझं कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य मी अखेरच्या श्वासापर्यंत निभावत राहीन, असे मत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पूरग्रस्त कुटुंबियांशी संवाद साधताना व्यक्त केले आहे.

परळी वैजनाथ शहरातील सरस्वती नदीला मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर आल्याने पुराचे पाणी काही घरांमध्ये शिरून कौटुंबिक साहित्य, कपडे, भांडी, अन्नधान्य आदींचे नुकसान झाले होते. त्यांना तात्काळ दिलासा म्हणून धान्याच्या किट देण्यात आल्या, त्याचबरोबर प्रशासनाच्या नियमानुसार तहसील कार्यालयामार्फत प्रत्येक बाधित कुटुंबाला प्रत्येकी पाच हजार रुपये तर कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या संस्थेच्या मार्फत तब्बल दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येत आहे.

# पाटलांच्या खिंडीत सरकार; फडण'विसां'चे 'बारा'च वाजणार



### क्रॉसलाईन

सामान्य माणसाला हरवणे अवघडच नाही तर अशक्य असते, अफवा प्रचार करून काही वेळ मळभ निर्माण केला जाऊ शकतो मात्र प्रमाणिकतेला पर्याय नसतो हे सिद्ध प्रसिद्ध करणारे नाव म्हणजे मनोज जरांगे पाटील . मु.पो.सराटी, डोक्यात हवा न जाऊ देता, हवा तो चेहरा आणि लढा समाजाला देणारे मनोज जरांगे सरकारला सह्याद्रीच भासत असावेत. आज तारखेला सरकारी फडात शक्य तेवढी कावे होऊन झाली आहेत मात्र गडी पुरून उरला आहे . विस्थापितांची प्रेरणा म्हणून हा हिमालय प्रस्थापिताना जड जातोय आणि इथेच सगळे दुखणे आहे, काय हवे ते मागा मात्र ते सामाजिक नसावे व्यक्तिगत असावे, पाटील मात्र जे मागतात ते समाजासाठी, प्रस्थापितांची गोची तिथे झाली आहे, चपलांचे खच आमच्याच दारात असावेत, गावचा सरपंच देखील बंगले ठरवतील, मात्र याला छेद दिला एका फाटक्या माणसाने आणि सगळी प्रस्थापित चादर उधडून टाकली आहे त्या माणसांचे नाव आज व्यक्ति म्हणून नाही तर श्रद्धा शक्ति आणि भक्ति म्हणून घेतले जात आहे. मनोज जरांगे आज व्यक्ति नाही विभूति आहे, ज्याच्या कपाळी तो मंदिराचा पुजारी , अश्या वेळी सरकार ला सराटी म्हणजे वाटेतले सराटे भासले नाहीतर कमाल. आज सत्तेसाठी गोविंदबाग रेशीमबाग (आकाश – पाताळ ) एक करायला निघालेले भाजप एका माणसामुळे चिखलात फसले आहे, ज्या चिखलात कमळ आणायचे त्याच चिखलात देव इंद्राची सेना अडकली आहे.

मराठा आज अनेकांना एक जात वाटते, ती आहे पण, मात्र मराठा एक वेदना आहे, पिढ्यान पिढ्या चार घराने पुढे करून सदन जमात भासवली तो मराठा आज मूठ आवळून निर्वाणीचा लढा लढतो आहे, कोपराला गूळ तोंडाला पानी सोडून मते घेणारी अनेक सरकारे मागे टाकली, ३५० बलिदान आणि लाखों लेकरांना ओपनचा डाग त्यांना सहन करावा लागला आहे, घरी अठरा पगड दारिद्र्य असताना ज्याच लेकरू एक मार्कने घरी बसते ना, त्याला मराठा म्हणजे दुख काय ते विचारा, सुवर्ण म्हणून आरक्षण नाही , शेतीतल्या मालाला भाव नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यात ८० टक्के मराठाच कसे असतात. पाटील म्हणायचे मात्र त्याच पाटलाच पोरग बेरोजगार आहे, लेकीला शिकवणे दुरापास्त आहे. जमीन कसणे म्हणजे निसर्गाच्या जिवावर तिरट खेळण्यासारखे आहे ते ही बलाइंड , मोठ्या मराठ्यांच्या नावाने गरीब व गरजवंत मराठा कायम उपेक्षित आणि वंचित आहे . मनोज जरांगे हाच लढा लढत आहेत म्हणून आज ते सामाजिक ताईत आहेत.

◆ संपादकीय...

# ‘लालबागचा राजा’ची जगभरात ख्याती!



गणेश चतुर्थी हा हिंदू धर्मातील प्रमुख सणांपैकी एक आहे. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्ष चतुर्थीला हा सण साजरा केला जातो. यंदा ७ सप्टेंबर गणेश चतुर्थीला बाप्पाचे आगमन झाले असून १७ सप्टेंबरला गणेश विसर्जन होईल. गणेशोस्तवात मुंबईचे एक वेगळेच रूप पाहायला मिळते. मुंबईच्या गल्ली-गल्लीत बाप्पाची स्थापना केली जाते. या दहा दिवसांमध्ये संपूर्ण मुंबईमध्ये आकर्षक रोशणाई केली जाते. अशा परिस्थित मुंबईतील आवर्जून पाहण्यासारख्या आणि सर्वांत श्रीमंत मंडळांच्या यादीत ‘लालबागचा राजा’चे नाव सर्वांत आधी येते.

लालबागचा राजाची स्थापना इ.स. १९३४ साली करण्यात आली. लालबाग परिसरात सध्या अस्तित्वात असलेले मार्केट निर्माण होण्यासाठी कोळी व इतर व्यापारी बंधूनी नवस केला होता. १९३२ साली त्यांची ही इच्छा पूर्ण झाली आणि पेरुचाळ येथे उघडयावर भरणारा बाजार बंद होऊन सध्याच्या जागी कायमस्वरुपी बांधण्यात आला. त्यावेळचे नगरसेवक कुंवरजी जेठाभाई शाह, डॉ. व्ही. बी. कोरगांवकर, नाकवा कोकम मामा, भाउढसाहेब शिंदे, डॉ. यु. ए. राव यांच्या प्रयत्नाने जागेचे मालक रजबअली तय्यबअली यांनी बाजार बांधण्यासाठी आपली जागा दिली. यानंतर १९३४ साली होडी वल्हवणाऱ्या दर्यासारंगाच्या रुपात गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली. या घटनेनंतरच नवसाला पावणारा गणपती म्हणून लालबागचा राजाची ओळख झाली. लालबागचा राजा लोकप्रिय होण्यामागचे आणखी एक कारण म्हणजे याच्या बाजूलाच ‘मुंबईचा राजा’ म्हणजेच ’गणेश गल्ली’चा राजा आहे. गणेश गल्लीची रांग कधीकधी इतकी लांब व्हायची की ती लालबागचा राजापर्यंत पोहोचायची. यानंतर लोक लालबागचा राजाचेही दर्शन घ्यायचे आणि यामुळेच तेथील गर्दीही वाढू लागली. अनेक भाविकांनी म्हटले आहे की लालबागचा राजाने त्यांच्या इच्छा आणि नवस पूर्ण केले आहेत. २००१ च्या बातम्यांमधून लालबागचा राजा चर्चेत आला. या प्रसिद्धीनंतर परदेशातूनही लोक लालबागचा राजाच्या दर्शनाला येऊ लागले. मोठमोठे राजकारणी, उद्योगपती, क्रिकेटर, समाज-सेवक, अभिनेते गणपतीला भेट देऊ लागल्याने या मंडळाला आणखी प्रसिद्धी मिळाली. या दहा दिवसांच्या उत्सवात लालबागचा राजा लाखों भाविकांना आकर्षित करतो. या काळामध्ये बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी जवळपास ५ किलोमीटर लांब रांग लागते. अनंत चतुर्थीला गिरगांव चौपाटी येथे लालबागचा राजा गणेश मूर्तीचे विसर्जन होते.

## जाहीर प्रगटन

**मा. एम. आर. बडाख. ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०८८/२०२४**

**सुरेश विरूध्द निरंक नि. ७ सी.**

अर्जदार- १. सुरेश सखाहारी काळे, वय ६२ वर्षे, धंदा पेन्शनर, रा. सहयोग नगर, जालन रोड, बीड ता. जि. बीड. २. जयेंद्रकुमार सखाहारी काळे, वय ५८ वर्षे, धंदा -व्यापार, रा. सदर, ३. चंद्रकांत सखाहरी काळे, वय ५२ वर्षे, धंदा नोकरी, रा. सदर, ४. सुलोचना सखाहरी काळे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर , ५. मीरा दासू वाघमारे, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. बोधेगांव, ता. परळी वै. जि. बीड.

मागणी - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सखाहरी ईश्वरराव काळे रा. सहयोग नगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **सखाहरी ईश्वरराव काळे यांचा मृत्यु दि. २९.०५.२००४ रोजी सहयोग नगर, जालना रोड, बीड ता.जि.बीड** येथे मृत्यु झाला असुन अर्जदार क.१ ते ३ हे मयत यांचे मुले असून अर्जदार क्र.४ अर्जदार नं. ४ ही मयताची पत्नी आह. अर्जदार क्र १ ते ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. ५ यांच्या शिवाय मयत यांना इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत.

**मयत सखाहरी ईश्वरराव काळे** यांचे निधन झाले आहे. मयताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, **सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत** असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीय पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह **मयत सखाहरी ईश्वरराव काळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ जुलै २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढीले तारीख दि. ०९/०९/२०२४ आहे.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक सहा. अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## टी.सी. हरवला आहे.

**ऋषिकेश शिवनाथ सव्वाशे या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टी. सी. गेवराई ते तिंतरवणी बस प्रवासामध्ये हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

**संपर्क मो.न. ९६२३९ ९२२१६**



*मराठा संघर्ष योद्धा माननीय मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात होणाऱ्या घोंगडी बैठकीची पूर्व नियोजन बैठक आज शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडली.बीड मध्ये होणाऱ्या घोंगडी बैठकीस मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. यावेळी माझ्यासह बीड जिल्ह्यातील सर्व मराठा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# बीडमध्ये आज मनोज जरांगे पाटील यांची घोंगडी बैठक

**बीड । प्रतिनिधी**



मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांची आज दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर घोंगडी बैठक आयोजीत करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून या बैठकीची तयारी सुरू असुन बीड शहरात ठिकठिकाणी मोठमोठे बॅनर लावण्यात आले आहेत. आज दुपारी सर्व मराठा सेवकांनी छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण याठिकाणी भेट देवून मैदानाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. उद्या होणाऱ्या घोंगडी बैठकीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले असुन मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील काय बोलतात ? याकडेही सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

पान १/३ वरून पुढे...

## धनंजय मुंडे यांच्या...

भरभरून प्रतिसाद देत टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात परळीकर रसिक ,प्रेक्षकांनी दाद दिली. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा अतिशय भव्य दिव्य व नेत्र दीपक अशा पद्धतीने झाला. यावेळी धनंजय मुंडे, सौ. राजश्रीताई मुंडे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर कलाकारांचा नाथ प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### ▸ धनंजय मुंडे यांनी टीकाकारांचा घेतला समाचार व नाथ प्रतिष्ठानच्या सामाजिक दायित्वाची दिली साक्ष

यावेळी बोलताना नाथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षापासून नाथ प्रतिष्ठान अविरतपणे वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक मेजवानी व महाराष्ट्रातील कलाकारांच्या कलेला एक भव्य दिव्य व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करत आहे. मात्र काही लोकांच्या हे पोटात दुखत असून या कार्यक्रम ावरून टीका करण्याचे काम काही जण करत आहेत. राजकारण करताना सांस्कृतिक व सामाजिक चळवळ जपण्याचे काम नाथ प्रतिष्ठानने केलेले आहे. एवढेच नाही तर प्रत्येकाच्या सुखदुःखात एक साथीदार अशी भूमिका नाथ प्रतिष्ठानने वेळोवेळीच निभावली आहे. अनेक नैसर्गिक संकटे असो सामुदायिक विवाह सोहळे असो किंवा कोरोनाचा काळ कोणत्याही कठीण प्रसंगात नाथ प्रतिष्ठान पावला पावलावर प्रत्येकाच्या सुखदुःखात एक खंबीर आधार म्हणून उभे राहिलेले आहे. काल परवाच परळी शहरात झालेल्या पूर परिस्थितीत आपण स्वतः चिखल तुडवत या कुटुंबांची भेट घेतली. पूरग्रस्तांना आवश्यक अन्न, पाणी निवारा यासह आर्थिक मदतीपर्यंतचे कामही याच नाथ प्रतिष्ठानने केलेले आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे नाव आणि निर्माण झालेली प्रतिमा याला गालबोट लावण्याचा प्रयत्न काही शक्ती जाणीवपूर्वक करत आहेत. मात्र याला न जुमानता नाथ प्रतिष्ठानचा हा उपक्रम इतर सामाजिक उपक्रमांच्या बरोबरीने अविरतपणे सुरूच राहणार असून या महोत्सवात आयोजित केले जाणारे कार्यक्रम हे सांस्कृतिक व लोककलांचा एक भाग आहे, त्यावर टीका करणे म्हणजे आपल्या संस्कृती व आलेल्या कलाकारांचा अपमान आहे असल्याचे धनंजय मुंडे यांनी ठणकावून सांगितले.

यावेळी युवक नेते अजय मुंडे, नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे म ान्यवर नेते व पदाधिकारी यांसह आदी उपस्थित होते.

## महानुभाव पंथ तिर्थक्षेत्राच्या...

महोत्सवाचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी केले. यावेळी आचार्य श्री उपाध्य कुलभुषण श्री शेवलीकर बाबाजी उर्फ धाराशिवकर, आचार्य श्री कळमकर बाबाजी म हानुभाव, साहित्याचार्य श्री संतोष शास्त्रीजी कपाटे, ह.भ.प.श्री. योगोश्वर उपासणी महाराज, आचार्य मानेकर बाबाजी शास्त्री, ह.भ.प.श्री. शाम चैतन्यजी महाराज, श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज, महंत श्री कृष्णराज बाबा गुर्जर, महंत श्री मल्लेबाबा शास्त्री, महंत श्री वाडेगांवकर बाबा शास्त्री, रविंद्र कोठी, अध्यक्ष श्रीदत्तप्रभु भोजन संस्थान, पांचाळेश्वर, जिजा पाटील शेळके, भाऊसाहेब नाटकर, भरतराव खरात, विलास बडगे, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित आदींसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सकाळी सर्वप्रथम महानुभाव धर्म ध्वजारोहन करण्यात आले, दिप प्रज्वलानंतर धर्मसभेला प्रारंभ झाला. प्रास्ताविक महंत श्री कृष्णराज बाबा गुर्जर यांनी केले. यावेळी उद्घाटनपर बोलतांना ना. धनंजय मुंडे म्हणाले की, श्री चक्रधर स्वामी यांनी महानुभाव पंथाचे विचार आणि तत्व मराठी सारख्या लोकभाषेत मांडुन मराठी वांड्मय खर्या अर्थाने समृद्ध केले आहे. व्यक्तीचे श्रेष्टतत्व जन्माने नव्हेतर त्याच्यातील तत्वज्ञानातुन ठरते हे सांगणारा म हानुभाव पंथ आहे. महानुभाव पंथात जातीभेदाला थारा नाही. १२ व्या शतकात त्यांनी सात व्यसनांचा त्याग करण्याची शिकवण दिली मात्र आत्ताच्या काळात व्यसनांची संख्या वाढली असुन अशा समाजविघातक व्यसनांपासुन पुढच्या पिढीला दुर ठेवण्याचे काम करण्यासाठी संतमहंतांना पुढाकार घ्यावा लागेल हे सांगतांना ना. धनंजय मुंडे यांनी महायुती सरकारने श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनाच्या औचित्याने महानुभाव पंथाच्या राज्यातील पाच प्रमुख देवस्थानच्या विकासासाठी ७८ कोटी रुपयांचा निधी मंजुर केल्याचे सांगितले. यामध्ये श्रीक्षेत्र पांचाळेश्वर देवस्थान विकासासाठी ७.९० कोटी रुपये, श्री रुद्रपुर देवस्थान विकासासाठी २५ कोटी रुपये, श्रीक्षेत्र पोहीचा देव देवस्थान विकासासाठी ४.५४ कोटी रुपये, श्री जाळीचा देव देवस्थान विकासासाठी २३.९९ कोटी रुपये तर श्री गोविंदप्रभु देवस्थान विकासासाठी १८ कोटी रुपये निधी मंजुर केल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती सरकारने पांचाळेश्वर देवस्थान विकासासाठी निधी मंजुर केल्या बद्दल महोत्सवाचे स्वागताध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी ना. धनंजय मुंडे यांचे आभार व्यक्त केले. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी श्री चक्रधर स्वामींच्या विचारांचे आचरण समाजाने करण्याचे गरज असल्याचे सांगितले. यावेळी सभाध्यक्ष धाराशिवकर बाबा, कळमकर बाबा, मानेकर बाबा, योगेश्वरजी उपासणी महाराज, संतोष मुनीजी शास्त्री आदींनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिल मराठे आणि सुशिल टकले यांनी केले. महोत्सवाला महिला भगिंनीसह महानुभाव पंथीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकशाही पत्रकार संघाच्या...

ठाम पणे उभे राहून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी भविष्यात काम करणार असल्याचं सांगत या जिल्हा पातळीवरील महत्त्वाच्या पदावर निवड करत काम करण्याची संधी दिली म्हणून अध्यक्ष भागवत वैद्य व लोकशाही पत्रकार संघाच्या सर्व टीमचेही आभार मानले. एकंदरीत या निवडीनंतर पत्रकार दत्तात्रय नरनाळे यांच्यावर विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.पुढील कार्यास लोकशाही पत्रकार संघाच्या सर पदाधिकारी यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## बदामराव पंडीत यांना मोठ्या...

स्वागत करत शुभेच्छा दिल्या व शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्यासाठी आपण निष्ठेने कामाला लागावे असे सांगितले. यावेळी माझ्यासह माजी जिल्हा परिषद सभापती पंढरीनाथजी बापू लगड, युवासेनेचे सिराज सर, संजय बप्पा नरवडे ,भारत जवळकर,उमेशजी आनेराव, अध्यक्ष राजाभाऊ नरवडे, अशोकराव पटाईत, गणेश पटाईत,सप्नील सिरसट,दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड, युवा नेते बाळासाहेब नागटीळक, युवा नेते विठ्ठल नांदे, युवा नेते राजेंद्र सातपुते, अच्युतराव मुंडे,गोवींद शिंदे, नाना शिंदे,अकाश गायवळ,मारोती जाधव,युवा नेते सुदर्शनजी मोरे,अश्वीन लांडे पाटील, युवा नेते कैलासराव थोटे,राजेंद्र नरवडे, प्रल्हाद इंगोले,झुंबर जाधव, काशीनाथ पवार,अली भैय्या कुरेशी,अजित कुरेशी, सिध्देश्वर नरवडे,मिनानाथ निर्मळ,रूषीराज गिरी,सोफीयान शेख ,राघुजी आण्णा सातपुते, प्रभाकरजी नांदे,रामेश्वर सातपुते सर,लक्ष्मण सातपुते, अश्विन लांडे, कैलास थोटे, गणेश नरवडे, गणेश पटाईत, काशिनाथ पवार, विठ्ठल नांदे सह पिंपळनेर सर्कल मधील शिवसेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळीकरांची सेवा हा...

या मदतीचे आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ३५ कुटुंबांना धनादेश स्वरूपर वितरण करण्यात आले. तर उर्वरित कुटुंबांना सोमवार व मंगळवार या दोन दिवसात घरपोच वितरण करण्यात येईल. ही मदत एकूण ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना देण्यात येणार असून कुटुंबांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्ती मध्ये नाथ प्रतिष्ठान पुढाकार घेत परळीवासीयांच्या मदतीला पावलोपावली धाव घेत असते. आर्थिक दुर्बल कुटुंबातील हजारो मुलींचे सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कन्यादान करण्याचे कामही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने आजवर करण्यात आलेले आहे. कडक लॉकडाउनच्या काळात देखील हजारो कुटुंबापर्यंत अन्नधान्य किराणा भाजीपाला तसेच औषधी ते अगदी रेमडिसिव्हीर मोफत पोहोचवण्याचे काम सुद्धा नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. दिवाळी, ईद, गणेशोत्सव यासारख्या सणांच्या काळामध्ये देखील नाथ प्रतिष्ठानने अनेक वर्षांपासून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

यावेळी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शकील कुरेशी, अय्युब पठाण, शंकर आडेपवार, विजय भोयटे, नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन कुलकर्णी, उपाध्यक्ष शंकर कापसे, अजीज कच्छी, अन्वर मिस्किन, इस्माईल पटेल, रवी मुळे, अनंत इंगळे, अल्ताफ पठाण, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य अनेराव, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष गोविंद कराड, लाला खान, गफार काकर, जावेद कुरेशी, राजू शेख, सुरेश नानवटे, गौस कुरेशी, अश्फाक शेख, नायब तहसिलदार बाबुराव रुपनर, न.प.चे कार्यालय अधीक्षक संतोष रोडे यांसह आदी उपस्थित होते.

## मी कोणाच्या नादी...

समाजाच्या आरक्षणात राजकारण आणू नये अशी कळकळीची या राज्यकर्त्यांना विनंती आहे. फडणवीसांनी माझ्यावर सापळे रचण्यात वेळ घालवण्यापेक्षा गोरगरीब मराठा समाजाच्या घरात जाऊन बसावे आणि त्यांच्या वेदना समजून घ्याव्यात म्हणजे त्यांना समजेल की मराठा समाजाला आरक्षण कशासाठी लागते? मराठा समाजाच्या वेदना आणि अडचणी प्रचंड आहेत त्यांनी अगोदर त्या समजून घ्याव्यात. कष्ट करून लेकर शिकवायला काय संघर्ष करावा लागतो हे या निष्ठुर शासनाला कधीही कळणार नाही. मराठ्यांनी फडणवीसांनी मनमानी ऐकून घेण्यासाठी लेकरं शिकवले नाहीत. मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या लेकरांच्या मुळावर उठले आहेत. फडणवीस मराठ्यांच्या लेकरांना तडपायची वेळ आणत आहेत. आमचे लेकरे आम्ही कष्ट करून शिकवत आहोत. मराठा आणि कुणबी एक असताना शासन जाणीवपूर्वक या गोष्टी मान्य करत नाही. ज्या नोंदी सापडल्या त्याही रोखून धरण्याचे कटकारस्थान हे सरकार करीत आहे. जे राज्यकर्ते स्वतः जातीयवादी आहेत, तेच आम्हाला जातीयवाद शिकवतात याचं आश्चर्य वाटत. मराठ्यांनी मनावर घेतल तर आरक्षणाच्या विरोधातील नेत्यांना घराच्या बाहेर पडू देणार नाहीत. मात्र हा समाज म ाझ्याकडे पाहून गप्प बसतो आहे. मराठा समाजाच्या विरोधात गेले तर एकही आमदार महाराष्ट्रात निवडून येऊ देणार नाही.

मराठा समाज ज्यांना निवडून देतो, ज्यांना मतदान करतो, ज्यांच्या निवडून आल्यानंतर मिरवणुका काढून डिजे वर नाचतो. त्याच समाजाच्या विरोधात हे निवडून गेलेले आमदार काम करत आहेत. त्यामुळे आता इथून पुढे मराठा समाजाने समाजाचे शत्रू ओळखले पाहिजेत. त्यांना येथून पुढे दरात उभे करू नका. आपलीच लेकरे आपल्याला विचारणार आहेत. हे हरामखोरी राज्यकर्ते तुम्हाला विचारायला येणार नाहीत असे प्रखर विचार मनोज जरांगे पाटील यांनी परळी शहरातील घोंगडी बैठकीत व्यक्त केले. मी समाजासाठी पोटाला चिमटा घेऊन उपाशी मेलोय, या कुटील राज्यकर्त्यांना अंगावर घेतलंय. मी यापुढेही समाजासाठी माझा जीव देईल मात्र समाज बांधवांनी या असल्या राज्यकर्त्यांच्या पाठीमागे धाऊ नका असेही ते म्हणाले.

### ▸ भव्यदिव्य शोभायात्रा आणि सत्कार

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे रविवारी परळी वैजनाथ येथे घोंगडी बैठकीच्या निमित्ताने आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्यास हार घालून अभिवादन केले. यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. मराठा समाज बांधवांच्या वतीने जरांगे पाटील यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

## विस्थापिताचा 'नाथ'...

यावेळी पंचनामे करण्याचे निर्देश देऊन शेतकऱ्यांना योग्य त्या मदतीसाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, असेही सांगितले. या ठिकाणी झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असे आश्वस्त केले.यावेळी माजी मंत्री बदामराव (आबा) पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक, तालुकाध्यक्ष मनोहर डाके, गंगाभिषण थावरे, विश्वांभर थावरे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, गंगाभाऊ घुमरे, अण्णासाहेब राठोड, धनंजय गुंदेकर, मंजूरभाई शेख, अभय पाटील, हरिभाऊ सोळंके, दयानंद स्वामी, कचरू खळगे, भीम राव हाडोळे, मुंजाभाऊ घायतिडक, मनोज फरके, दीपक जाधव, विलास खंडागळे, राम नरवडे, सखाराम मुधोळकर, प्रशांत मोरे, अविनाश इंगळे इत्यादी उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

## ‘फडणवीसांनी ट्रॅप...

नाहीतर महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही. फडणवीस साहेब माझ्या नादाला लागू नका नाहीतर सुपडा साफ करून टाकू, पळता भुई होईल. जो विरोध करतोय त्या आमदाराच्या दारात जाऊन हिशोब समाचार घेतला जाईल, असा इशारा जरांगेंनी दिला आहे.

फडणवीसांनी मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या विरोधात घातले. मराठ्यांच्या लेकरासाठी मी सरकारचा विरोध घेतला. जीवाची बाजी लावून लढतोय. मी कधी मरेल सांगता येत नाही. मी काय चूक केली? मी फडणवीसांना का बोलणार नाही? सत्तेत बसले म्हणून बोलणार. फडणवीस सत्तेतून बाहेर पडा, तुमचं नावही घेणार नाही, असं वक्तव्य जरांगे पाटील यांनी केलं आहे.

## शेतकरी पुत्र सुरेश...

घेत शासन दरबारी आपण मांडलेल्या प्रश्नाचे निराकरण करुन शेतकरी राजाला तातडीने मदत कार्य केले जाईल अशी ग्वाही दिली. स्वत: शेतकरी पुत्र असलेल्या सुरेश पाटलांना बळीराजाच्या समोरील असणाऱ्या समस्यांची जाण आहे,जिल्ह्यात मागच्या काही दिवसापूर्वी कोरडा दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण झाली होती, परंतु ऑगस्टच्या शेवटी पडलेल्या मुसळधार पावसामुळे जरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मि टला असला तरी मात्र शेतकऱ्यांनी कोरडया दुष्काळात जगवलेल्या पिकांची मात्र नासाडी झाली आहे. सगळच पिक पावसाने हिरावुन घेतल्यामुळे शेतकऱ्यांना रडायडा जागा उरली नाही, शेतकरी पुरता हतबल होऊन ढासळला गेला आहे. मात्र आमचा शेतकरी जगला पाहीजे तो जगाचा पोशिंदा आहे याची जाण असणाऱ्या सुरेश पाटील यांनी या शेतकऱ्यांच्या व्यथांचे गाठोडं थेट बीडच्या जिल्हाधिकारी समोर सोडल्याने, शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई तात्काळ मिळवुन देण्यासाठी आणि आश्रु पुसण्यासाठी शेतकरी पत्र सुरेश पाटील हे पुढे सरसावले आहेत. जिल्हाधिकार्यांनी सुरेश पाटलांना विश्वास दिला आहे कि एकही शेतकरी भरपाई पासून वंचित राहणार नाही लवकरात लवकर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासन स्तरावर मदत पुरवली जाईल.स्वतहा शेतकरी पुत्र असणाऱ्या सुरे पाटलांनी मा. जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेऊन सखोल चर्चा केल्यामुळे आणी मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या चर्चेला साद दिल्यामुळे आता लवकरच बीड जिल्ह्यातील शेतकरी राजाला शासन स्तरावरील मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात आशा पल्लवित झाल्या आहेत.

## जी माणसे माणसा...

माणसा सारखे वागा केवळ माणसासारखे दिसणे दिसणे अपेक्षित नाही. माणसाने जनावरासारखे वर्तन करू नये. असे दुर्गुण नष्ट करून माणसाने माणसासोबत असलेल माणुसकीचे नाते जपणे गरजेचे आहे.आणि हीच बुद्ध धम्माची खरी शिकवण आहे. माणसातील पशुत्व नाहीसे करणारे औषध म्हणजे बुद्ध धम्म होय.

आजच्या पूजेचे यजमान लताताई मथुरादास बनसोडे आणि ज्योतीताई तेजसकुमार बनसोडे त्यांच्या वतीने उपस्थितांना भोजनदान देण्यात आले.

प्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कणके यांचा सपत्नीक तर, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे शिवाजी धाईजे, वसंतराव जावळे, माजी नगरसेवक सचिन डोंगरे, माजी जि .प . समाज कल्याण सभापती गयाताई आव्हाड,वंचित आघाडीचे धम्म ानंद साळवे,अंकुश जाधव,पूजेचे यजमान बनसोडे परिवार यांचा सद् धम्म सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड दशरथ मकसरे यांनी केले तर,आभार सदाशिव भालेराव यांनी मानले.या वेळी सद् धम्म सेवा संघाचे अरुण नाकलगावकर, श्यामराव वाघमारे, भगवानराव सातपुते, पांडुरंग जाधव, रविकांत उघडे, सोपानराव उजगरे, एम.बी.चांदमारे, जी एन घनगाव, वाल्हाबाई टाकणखार, लिलाबाई उजगरे, हे उपस्थित होते. तर राजश्री शाहू शिक्षक पथसंस्थेचे अध्यक्ष कपिल डोंगरे, मनीषा सिद्धार्थ ढवळे, शांताबाई साळवे, सुशीलाताई चांदमारे, पुनमताई धाईजे,दीपक भालेराव,बबनराव खोपे,विलास साळवे,राजरत्न खळगे,मनोरमाताई सोनवणे,आशाताई शिरसट, लक्ष्मणराव बनसोडे, गोविंदराव टाकणखार,नवनाथ गायकवाड, प्रा.संजय बागुल,अनिताताई वाघमारे,मीरा वाघमारे,कमलबाई श्रीमंतराव डोंगरे,सुधामती जावळे,इत्यादी बौद्ध उपासक उपासिका माजलगाव शहर आणि ग्रामीण भागातून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## लिंबागणेश येथील...

संस्थान पोखरी, बजगुडे महाराज बेलखंडी पाटोदा, दादासाहेब शिंदे महाराज वैद्यकिन्ही, हनुमान महाराज येवले सडकेची येवलवाडी,राजु लोखंडे पाटोदा,खुळे महाराज वैजाळा, शहादेव महाराज येडे मोरगाव, विष्णू महाराज घरत महाजनवाडी अशोक येडे मृदंगाचार्य तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी अजित दादा गट बळीराम गवते याची प्रमुख उपस्थिती होती. काल्याच्या किर्तनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

# धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित...

# वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवाचे शानदार उद्घाटन





- अभिनेत्री रश्मीका मंदाना व कृती सेनन यांनी जिंकली परळीकरांची मने
- गणेशोत्सवातील लोककलांवर टीका म्हणजे संस्कृती व कलाकारांचा अपमान :धनंजय मुंडे
- नाथ प्रतिष्ठान प्रत्येकाच्या सुखदु:खाचा सदैव साथीदार:धनंजय मुंडे
- १९ वर्ष सातत्याने भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन हे काही खायचं काम नाही: अभिनेता संकर्षण कऱ्हाडे
- 'कुछ नाले खुद को समंदर समझ बैठे है' मुंडेंची शायरी अन 'त्यांना' ईशारा!

**परळी वै.** । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या १९व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री पुष्पा फेम रश्मिका मंदांना व आदीपुरुष रामायणातील सीताफेम कृती सेनान यांच्या प्रमुख उपस्थिती झाले. यावेळी तमाम परळीकरांना स्मित हास्य देत रश्मिका मंदांना व गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करत अभिनेत्री कृती सेनान यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. तर या व्यासपीठावरून विरोधकांचा खरपूस समाचार घेत धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वेळोवेळी केलेल्या सामाजिक दायित्वाची साक्ष उपस्थितांसमोर मांडली.

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परळीकरांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी म्हणजेच वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांचे व कला सादरीकरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे आज झाले. यावेळी व्यासपीठावर धनंजय मुंडे यांच्यासह नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच आदीपुरुष रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सेनान या दोघींची प्रमुख उपस्थिती होती.तर या उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांनी केले.

पहिल्या दिवशी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम झाला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला (उर्वरित पान २ वर)

### एक स्मित हास्य आणि 'कस काय परळीकर' म्हणत रश्मिका मंदांनीने जिंकली मने

या कार्यक्रमाच्या उद्घाटिका प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदांना यांनी नाथ प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमाचे कौतुक करतानाच सर्वांना आपल्या स्मित हास्याने भुरळ घातली. एक स्मितहास्य आणि आपल्या भाषणाची सुरुवात 'कसं काय परळीकर' असे मराठीतून म्हणत तिने उपस्थित प्रेक्षकांची मनी जिंकली. तर रामायणातील सीताफेमा अभिनेत्री कृती सेनान यांनी 'जय श्रीराम' चा नारा देत 'गणपती बप्पा मोरया' असे म्हणत नाथ प्रतिष्ठानने आयोजित केलेला हा महोत्सव सर्वांसाठी एक मेजवानीच असल्याचे म्हणत धनंजय मुंडे यांच्या भव्य आयोजनाचे कौतुक केले.

### मुंडेंची शायरी अन ईशारा

दरम्यान राज्यात निवडणुकांचे वारे वाहू लागले असून अनेकजण तयारीला लागले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात देखील अनेक इच्छुक वेगवेगळ्या पक्षांकडून तयारी करत असून, वेगवेगळ्या अफवा पसरवणे व टीका करण्याचे काम करत आहेत, त्यांना धनंजय मुंडे यांनी त्यांच्या खास शैलीत 'सही वक्त पर करवा देंगे हदो को एहसास, कुछ नाले खुद को समंदर समझ बैठे है' या खास शायरीतून ईशारा दिला आहे!

## पेट्रोल पंपाचे ८२ हजार रूपये घेऊन कामगार झाला फरार

**शिरूर** । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील व्यंकटेशा पेट्रोल पंपावर काम करणारा कामगार पेट्रोल पंप मधील ८२ हजार रुपयांची रक्कम स्वतःच्या बँक खात्यामध्ये टाकून फरार झाल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे महादेव शिवाजी कोकाटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टाकळी हाजी (ता. शिरुर) येथे प्रभाकर गावडे यांच्या मालकीचे व्यंकटेशा पेट्रोल पंप असून येथे कामगार असलेल्या महादेव कोकाटे याने ग्राहकांकडून ऑनलाइन पद्धतीने आलेले पैसे त्याच्या स्वतःच्या बँक खात्यामध्ये घेतले. त्यांनतर गोळा झालेली रोख रक्कम मालकाकडे जमा केली. मात्र ऑनलाईन पद्धतीने घेतेलेले तब्बल ब्याऐंशी हजार रुपये रक्कम त्याच्या जवळ ठेवून घेत मालकाची फसवणूक करुन तो फरार झाला. याबाबत प्रभाकर बापूराव गावडे (वय ६५ वर्षे रा. टाकळी हाजी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी महादेव शिवाजी कोकाटे (रा. गायकवाड वस्ती जळगाव ता. शेवगाव जि. अहमदनगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उमेश भगत हे करत आहे.

# महानुभाव पंथ तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी कमी पडु देणार नाही : कृषी मंत्री धनंजय मुंडे

## श्री चक्रधर स्वामींची शिकवण समाजाला सदैव प्रेरणा देईल : विजयसिंह पंडित
## गेवराई येथे श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाचे उत्साहात आयोजन

**गेवराई** । प्रतिनिधी

श्री चक्रधर स्वामींनी कोणत्याही जात, धर्म किंवा सांप्रादायाच्या विचाराचे खंडन न करता महानुभाव पंथाचा प्रसार केला. आजच्या काळात सर्वधर्मीयांनी त्यांची शिकवण घेतली पाहिजे. गीतेतील उपदेश त्यांनी सामान्य भाषेत लोकांना कळतील अशा पद्धतीने मांडले, मराठी साहित्य परंपरेची खर्या अर्थाने सुरुवात चक्रधर स्वामींनी केली. त्यांच्या अवतार दिनाच्या औचित्याने महायुती सरकारने त्यांना अनोखे नमन केले. राज्यातील पाच देवस्थानांच्या विकासासाठी ७८



कोटी रुपयांचा निधी मंजुर केला असुन महानुभाव पंथीयांच्या तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी कमी पडु देणार नाही असे प्रतिपादन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी केले. श्री चक्रधर स्वामींची शिकवण समाजाला सदैव प्रेरणा देईल असे प्रतिपादन विजयसिंह पंडित यांनी केले. अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या वतीने गेवराई येथे आयोजित सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या बीड जिल्हा शाखेने महानुभाव पंथ प्रर्वतक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाचे रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी भव्य आयोजन केले होते. महोत्सवाचे स्वागताध्यक्ष म्हणुन बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी महोत्सवानिमित्त एकत्रित आलेल्या सर्व संतमहंतांचे स्वागत केले. (उर्वरित पान २ वर)



*बीड : मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी आणि बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची रविवारी (दि.८) सायंकाळी भेट झाली. यावेळी बाबा सिद्दीकी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले.*

## कामधंदा करण्याचा सल्ला ऐकताच मुलगा संतापला, अन् बापाचा जीव घेतला

**धुळे** । प्रतिनिधी

कामधंदा करण्यास सांगितल्याने संतापलेल्या मुलाने डोक्यात दगड घालून बापाची हत्या केल्याची घटना धुळ्यात घडली आहे. बापाची हत्या केल्यानंतर मुलगा फरार झाला आहे. बापू पांड्या कुवर असे मयत बापाचे तर विजय कुवर असे आरोपी मुलाचे नाव आहे. शेजाऱ्यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी पिंपळनेर पोलिसांना कळवले. साक्री तालुक्यातील खरगावमध्ये राहणारे बापू कुवर हे शेती करत होते. तर त्यांचा २५ वर्षाचा मुलगा विजय हा काहीच कामधंदा करत नसे. जेवण करत असतानाच बापाने मुलाला काहीतरी कामधंदा करण्याचा सल्ला दिला. पण हा सल्ला ऐकताच मुलगा संतापला आणि बापाच्या डोक्यात दगड घातला. यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. बापू यांचा मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेनासाठी रुग्णालयात पाठवला. विजय हा रागीट स्वभावाचा असून त्याला मानसिक समस्या असल्याचे कळते. पोलिसांनी फरार विजयचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना केली आहेत.



*श्रींची आरती करताना लोक पत्रकार भागवत तावरे दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे तनश्री नरनाळे , आराध्या नरनाळे*

## गणेश चतुर्थीनिमित्त सरकारचा निर्णय ; फक्त १०० रुपयांत मिळणार ४ वस्तू

**मुंबई** । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धूम असून प्रत्येकाच्या घरी गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत. गणरायाच्या आगमनाने सर्वांच्या मनात उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. आता याच आनंदात सरकारच्या एका निर्णयाने आणखी भर पडली आहे. गणेश चतुर्थीचे निमित्त साधून शिंदे सरकार कडून पुन्हा एकदा 'आनंदाचा शिधा' या उपक्रमाचे वाटप करण्यात येणार आहे. हा आनंदाचा शिधा यंदाही




अवघ्या १०० रुपयांत उपलब्ध असून सर्वसामान्य जनतेला या माध्यमातून ४ वस्तू देण्यात येणार आहेत. महाराष्ट्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने गणेशोत्सव डोळ्यासमोर ठेवून हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या अंतर्गत पात्र कुटुंबांना फक्त १०० रुपयांत चणाडाळ, तेल, साखर, रवा अशा ४ वस्तू मिळणार आहे. यात चणाडाळ १ किलो, सोयाबीन तेल १ लिटर, साखर १ किलो, आणि रवा १ किलो मिळेल. राज्यातील सर्वसामान्य आणि गरीब जनतेचा सण गोड व्हावा यासाठी सरकार हा उपक्रम राबवत आहे. मात्र यासाठी काही अटी सुद्धा आहेत. त्याची पूर्तता झाल्यानंतरच आनंदाचा शिधा मिळणार आहे. आनंदाचा शिधा वाटपासाठी सरकारकडून तब्बल ५६२ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहेत. जे कुटुंब अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधरक आहे त्यांना सरकारच्या या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. सोबतच प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांनाही हा आनंदाचा शिधा दिला जाईल. एप्रिल मे महिन्यात लोकसभा निवडणूक झाली त्यामुळे तेव्हा आचारसंहितेमुळे दोन महिने आनंदाचा शिधा बंद होता, आता मात्र गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा एकदा जनतेला या आनंदाच्या शिध्याचा लाभ घेता येणार आहे.

## 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई** । प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना नोंदणी करता येईल.

# आपल्या नशिबात जे आहे त्या गोष्टीला कोणीच हिरावुन घेऊ शकत नाही : स्वाध्यायी ज्योती शिंगी

- **पवित्र पर्युषण पर्वाची 'जैन संवत्सरीने' सांगता.**

**माजलगाव** । प्रतिनिधी

आपल्या नशिबात जी गोष्ट आहे त्या गोष्टीला कोणीही कितीही प्रयत्न केले तरी कुठल्याच पद्धतीने हिरावुन घेऊ शकत नाही असे प्रतिपादन स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी माजलगाव येथे केले. जैन चातुर्मासातील पवित्र असे ८ दिवस म्हणजे पर्युषण पर्व. या पर्युषण पर्वाच्या निमित्ताने स्वाध्यायी भवन अहमदनगर येथून नेवासा येथील ज्योती शिंगी, कोमल संचेती व भगवती कोल्हार येथून जयश्री राका यांना जैन धर्माचे आगमवाचन व ज्ञान, ध्यान प्रसारित करण्यासाठी माजलगाव येथील वर्धमान जैन स्थानक येथे पाठवले होते. त्यानिमित्ताने मागील ८ दिवसांत नेवासा येथील स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी जीवन जगण्याचे विविध असे सात सूत्र सांगितले ज्या सूत्रांनी आपल्या जगण्याचे सार्थक होईल असे ज्ञान त्यांनी उपस्थितांना दिले. यावेळी त्यांनी सांगितले की, आपला समजूतदारपणा आपल्या जवळच ठेवावा, बाहेर झालेला क्रोध, तणाव किंवा भांडणे घरात कधीच सोबत आणू नये, प्रत्येक वेळी आपली दुसऱ्यांच्या प्रती गुणात्मक दृष्टी असायला हवी, जगताना ज्ञान, ध्यान



आणि धर्म कायम अंगीकृत करून जगावे, जीवन जगताना कुठलाही गर्विष्ठपणा न ठेवता सर्वांशी मनोमिलन करून राहावे आणि प्रत्येक गोष्टीबद्दल आपल्या मनात सकारात्मक विचार असायला पाहिजे. या सर्व सूत्रांचे जर जीवनात अनुसरण केले तर आपल्या जीवन जगण्याचे सार्थक होईल व आपल्याला मोक्षप्राप्ती मिळेल असे स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी सांगितले. या पर्युषण पर्वाच्या निमीत्ताने स्वाध्यायी यांनी विविध ज्ञानोपासक खेळ, छोटे नाटक घेऊन त्यांच्या कलात्मक रचनेने समाजातील महिला व पुरुषांना मोलाचे ज्ञान दिले.

तर काल रविवार दि.८ सप्टेंबर रोजी वर्धमान जैन स्थानक येथे 'जैन संवत्सरी' या महापर्वाने पर्युषण पर्वाची सांगता झाली. यावेळी सिद्धता नवल पगारिया हिने ९ दिवस निरंकार उपवास केल्याबद्दल तिचे अनुमोदन करण्यात आले. त्याचबरोबर किरण तातेड, लब्धी लोढा, धीरज खारीया, कोमल खारीया, स्नेहा लोढा याचबरोबर भरपूर जणांनी १ दिवस, ३ दिवस, ५ दिवस असे विविध निरंकार उपवास केले यांचेही अनुमोदन यावेळी करण्यात आले. यावेळी समाजातील महिला, पुरुष, जेष्ठ, युवा व लहान मुलांची भरपूर उपस्थिती होती.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
।बीड ।परभणी ।छत्रपती संभाजीनगर ।जालना ।लातूर ।धाराशिव ।हिंगोली ।नांदेड ।नगर

# मराठवाडा पत्र

● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०९ सप्टेंबर २०२४ ● पान ४






*दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय मध्ये श्रींची आरती करताना श्रीराम जाधव, संपादक दत्तात्रय नरनाळे, तनश्री नरनाळे छायाचित्र दिसत आहे.*

# फडणवीसांनी ट्रॅप रचलाय...

## घोंगडी बैठकीतून मनोज जरांगे पाटीलांचा पुन्हा हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांची विधानसभा निहाय घोंगडी बैठक बीडच्या परळीमध्ये पार पडली. या बैठकीत जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला.

राजकारण येत राहील, जात राहील पण आरक्षण महत्त्वाचं आहे. सरकारसमोर पर्याय नाही, मराठ्यांना आरक्षण दिलं तर सरकार येत असतं नाही तर पडत असतं, असं मनोज जरांगे म्हणाले आहेत. माझ्याविरोधात एक आमदार उठतोय, देवेंद्र फडणवीसांनी ट्रॅप रचला आहे. फडणवीस साहेब मराठ्यांना छेडायचा नाद सोडा, बियाला सुद्धा भाजप राहणार नाही, असा इशारा म



नोज जरांगेंनी दिला आहे. फडणवीस यांचं ऐकून बोलणाऱ्या भंगार आमदाराला मराठ्यांच्या वेदना कळणार नाहीत. मराठा आरक्षणाच्या विरोधात गेला तर त्याला सुट्टी नाही, त्याचा कार्यक्रम होणार. मराठा आरक्षणाच्या विरोधात जाईल त्याला राजकीय फायदा घेऊ दिला जाणार नाही. फडणवीस साहेब माझ्यावर ट्रॅप रचण्यापेक्षा गरीब मराठ्यांच्या घरात जाऊन पाहा, असं जरांगे म्हणाले आहेत. फडणवीस साहेब तुमच्या सत्तेच्या हट्टापायी मराठ्यांची लेकरं मरायला निघाली, आमचे आमदार आमच्या विरोधात घातले. आम्हाला तळपळायला लावू नका, मराठ्यांचा अंत पाहू नका, (उर्वरित पान २ वर)

## शेतकरी पुत्र सुरेश पाटलांनी जिल्हाधिकारी समोर मांडल्या बळीराजाच्या व्यथा

**बीड । प्रतिनिधी**

सध्या बीड जिल्हयात झालेल्या मुसळधार पावसामुळे बळीराजाच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे, हाडाची काड आणि रक्ताचं पाणी करुन पिकवलेल्या पिकांचे होत्याचं नव्हतं झाले, बीड जिल्हयातला शेतकरी राजा पुन्हा धाय मोकलुन रडू लागला, परंतु या शेतकरी राजाच्या डोळयात आलेल्या अश्रूंना पुसण्यासाठी शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील हे थेट बीडचे जिल्हाधिकारी मा.अविनाशजी पाठक यांची भेट घेऊन बीडसह आष्टी/पाटोदा/शिरुर या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांचे सरसकट नुकसान झालेची माहिती देत जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसानीचे लवकर पंचनामे करुन त्यांना तात्काळ मदत देण्यात यावी यासह इतर चर्चा केली.

जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक साहेबांनी सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी मांडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकुन (उर्वरित पान २ वर)

## जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तेच खरे सुखी असतात: भिक्खू धम्मशील थेरो

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रतिनिधी माणसाचे माणसा सोबत असलेले माणुसकीचे नाते हाच बुद्ध धम्माचा केंद्रबिंदू आहे, म्हणून माणूस असाल तर माणसा सारखे वागले पाहिजे.जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तीच माणसे खरी सुखी असतात.समस्त मानव जातीला मनुष्यत्व प्राप्ती साठी बुद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही.असे प्रतिपादन आपल्या साप्ताहिक प्रवचनात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी केले.

सदधम्म सेवा संघाच्या वतीने श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी वसाहत येथे साप्ताहिक धम्म देसनेच्या प्रवचन मालिकेत दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी पू. भिक्खू धम्मशील थेरो आपल्या मानवी जीवनात बुद्ध धम्माचे महत्त्व या विषयावरील प्रवचन मालिकेत पहिले पुष्प गुंफताना बोलत होते. पुढे बोलताना भिक्खू म्हणाले की, बुद्धाचा धम्म हा बहुआयामी असून माणसाचे मंगल होण्यासाठी सर्वांगीण मार्ग सांगतो. मानवी जीवनाचा उत्कर्ष बुद्ध धम्मातच असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २१ वर्षाच्या काळात विविध धर्माच्या अभ्यासानंतर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला.

धम्म मनोरंजनाचा नाही तर, धम्मात नीतीमतेला स्थान आहे. धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म आहे. इथे मनाला विचारांचा आहार दिला जातो. आपले वर्तन सुधारायचे असेल तर केवळ मनोरंजन करून जमणार नाही. खरा धम्मरस समजून घ्यावा लागेल. अर्थात धम्माचा उद्देश समजून घ्यावे लागेल. यापैकी पहिला उद्देश माणसाने मनुष्यत्व प्राप्ती करून घेणे आहे. माणूस असाल तर (उर्वरित पान २ वर)

## जामखेड तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन तर्फे गुणवंताचा सत्कार



**जामखेड । प्रतिनिधी**

चिकाटीने प्रयत्न केले तर यश आपलेच असते असे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष डॉ.संजय राऊत यांनी केले नुकत्याच झालेल्या नीट परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल जामखेड येथील कु.अनुष्का प्रशांत वारे,चि.आयान फारुक शेख यांची एमबीबीएस साठी प्रवेश प्रक्रियेमध्ये निवड झाल्यामुळे जामखेड तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन च्या वतीने अभिनंदन व सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. फारुख शेख म्हणाले की,कष्ट, मेहनत घेतली आणि योग्य दिशेने जर अभ्यास केला तर निश्चितपणे यश मिळू शकते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर अनिल गायकवाड होते. यावेळी जामखेड तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन चे सचिव डॉ. पांडुरंग सानप, सहसचिव डॉ.अशोक बांगर ,सह कोषाध्यक्ष डॉ. प्रवीण मिसाळ, डॉ जतीनबोस काजळे, डॉ.सुरेश काशिद, डॉ. सुहास सूर्यवंशी, डॉ. प्रताप चौरे, डॉ. तानाजी राळेभात, डॉ. प्रदीप कुडके, डॉ. बाळासाहेब मुळीक, डॉ.सर्फराज खान, डॉ. गफार शेख, डॉ. अविनाश पवार, डॉ. बिपिन लाड आदी उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद अभ्यासिका नेकनुर येथील तीन विद्यार्थ्यांची पोलिस दलात निवड

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या नेकनूर या ठिकाणी स्वामी विवेकानंद अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी अनेक वेळा पाहायला मिळत आहे. बालाघाटावर स्वामी विवेकानंद अभ्यासिका चा निकाल अभूतपूर्व आहे दरवर्षी किमान दहा विद्यार्थी तरी कोणत्या ना कोणत्या परीक्षांमध्ये भरारी घेतात आणि पदावर रुजू होतात विशेष म्हणजे गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना नोकरी भेटते. विद्यार्थ्यांच्या रात्रंदिवस करणाऱ्या अभ्यासाला यश मिळते. यावेळी पोलीस दलामध्ये शैलेश शिंदे, सचिन काळे, सारंग सपकाळ आदी विद्यार्थ्यांनी उंच भरारी घेतली आहे. यावेळी स्वामी विवेकानंद अभ्यासिकेचे संचालक यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला यावेळी अभ्यासिकेचे संचालक अनिल महाराज कासकर कुरुक्षेत्र अॅकॅडमीचे संचालक आदेश कदम सर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



*दैनिक मराठवाडा पत्र चे अवलोकन करतांना भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे, दत्ताभाऊ थिगळे*

## वाचनाने मुले घडतात.वाचनालये देश उंचीवर घेऊन जाण्याचा आधार: संतोषबापु जेथलिया

**माजलगाव । प्रतिनिधी**



सावरगाव येथे अर्थव कोचिंग क्लासेस यांच्या वतीने अर्थव वाचनालयाची स्थापना करण्यात आली. तसेच विविध स्पर्धा चा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम खराडे सर यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोषबापु जेथलिया हे होते तर उदघाटक प्रमुख पाहुणे म्हणून डॉं कदम,प्रा स्वामी सुदर्शन,प्रा बोडखे,डॉं ऋषिकेश जेथलिया हे होते. या प्रसंगी संतोषबापु जेथलिया यांनी विचार व्यक्त करताना लहान लहान मुले,मुली हा देशाचा आधारस्तंभ आहे .देशाचा कणा आहे.हीच छोटी छोटी मुले देश पुढे घेऊन जाणार आहेत. भाषण न करता या मुलांना खेळते करत,बोलते करत त्यांच्या कडुन विविध गोष्टी जाणुन घेऊन, विविध प्रश्न विचारले.महापुरूष कसे जन्माला येतात हे सांगताना तुमच्या मध्ये ती गुणवत्ता आहे.असे विचार व्यक्त करत. लेकरांनी अभ्यास करून,वाचन करून मोठे होण्याचे वचन घेतले. या प्रसंगी बोलताना बोडखे सर यांनी लाकुड तोडयांची गोष्ट सांगत मुलांना विचारवंत होण्यासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. यावेळी विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले.वाचनालयासाठी विविध छान पुस्तकांची भेट डॉ.ऋषिकेश संतोषबापु जेथलिया यांनी भेट दिले. यावेळी अनंत खराडे,तीर्थराज पांचाळ, गणेश बादाडे, गणपतराव नाईकनवरे, दिगंबर मांडगवणे आबुज, शुभम जगताप, केशव नाईकनवरे, कृष्णा बादाडे.

## लिंबागणेश येथील अखंड हरिनाम सप्ताहाची वैराग्यमुर्ती रामकृष्ण रंदवे (बापु) यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभुमीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहाची सांगता आज दि.८ रविवार रोजी ह.भ.प.वैराग्यमुर्ती रामकृष्ण महाराज रंदवे ( बापु) श्रीक्षेत्र विठ्ठल गड संस्थान पाटोदा यांच्या भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या लीलांचे वर्णन करत अवतार संपेपर्यंत जीवन प्रवासावर प्रबोधन केले.दहिहंडीच्या कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता झाली.पाश्चात्य संस्कृतीने आज परिस्थिती बदलत आहे.आपली संस्कृती व संस्कार आपण विसरत चाललो असताना वारकरी संप्रदाय ते जतन करीत असुन किर्तनातुन समाज प्रबोधन करीत आहे.देव देश व धर्म याची महती पटवून देत राष्ट्र भावना जोपासत असल्याचे प्रतिपादन केले. सप्ताह काळात ह.भ.प.तुकाराम महाराज भारती,बेलेश्वर संस्थान, ह.भ.प. केशव महाराज वैष्णव हिंगणी ब्रु., विनोदाचार्य ह भ.प.पांडुरंग महाराज उगले माजलगांवकर, ह.भ.प.सिमामाई धर्मराज महाराज पाटील, गुरूपीठ सामनगावकर ह .भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे बंकटस्वामी संस्थान नेकनुर, ह.भ.प. राजेंद्र महाराज वाघमारे गोंदीकर, शिवचरित्रकार ह.भ.प. एकनाथ महाराज गाडे चकलांबा या नामवंत किर्तनकारांकडुन वेगवेगळ्या विषयांवर समाज प्रबोधन करण्यात आले.त्याच बरोबर हरिजागर,दुपारची प्रवचन सेवा मोठ्या उत्साहात पार पडली. आज काल्याच्या किर्तनात ह.भ.प. महादेव भारती महाराज मठाधिपती बेलेश्वर संस्थान, गिरी महाराज सिद्धीनाथ (उर्वरित पान २ वर)







## बीडमध्ये उत्कृष्ट देखाव्यासाठी लाखोचे बक्षीस ठेवणाऱ्या भावी आमदारांनी प्रथम जनतेचे प्रश्न सोडवावे : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील काही स्वतःला भावी आमदार समजून उत्कृष्ट देखावा सार्वजनिक गणेश मंडळाला लाखोचे बक्षीस ठेवले आहे. खूप चांगली बाब त्यामुळे गणेश मंडळालाही देखावा करायला उत्साह येईल. पण मला हे सांगायचे आहे की याचबरोबर जनतेच्या प्रश्नाकडे पण लक्ष द्या. दोन महिन्यापासून नाल्या काढायला कोणी येत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिगारे आहेत. त्यामुळे रोगराई पसरत आणि लहान मुले आजारी पडत आहे. त्याचबरोबर शहरातील एक ही रस्ता नीट राहिलेले नाही. विद्यमान आमदार तर बघायला येत नाही, कमीत कमी आपण तरी लक्ष द्यावे. हीच आपणास नम्र विनंती करतो.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com